# प्रशासकीय अहवाल
# २०२२-२३



बाष्पके संचालनालय,
कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

|| श्रमीकाणां कृते दक्षम् ||

# बॉयलर इंडिया २०२२ - क्षणचित्रे





बॉयलर इंडिया २०२२ या प्रदर्शनी व चर्चासत्राचे उदघाटन दिनांक १४ सप्टेंबर २०२२ रोजी मा.ना.डॉ.सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार), मा.ना.श्री.उदय सामंत, मंत्री (उद्योग), मा.आ.श्री.निरंजन डावखरे (वि.प.सदस्य), मा.आ.श्री.रमेश दादा पाटील (वि.प.सदस्य), कामगार विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती विनिता वेद सिंगल (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी रायगड तथा विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर (भा.प्र.से.), कामगार आयुक्त श्री.सुरेश जाधव (भा.प्र.से.), मे. ऑरेंजबीक टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. भानू राजगोपालन आणि बाष्पके संचालनालयाचे संचालक श्री. धवल अंतापूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

## महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ मधील नियम क्र. ५ अनुसार बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्याचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा प्रशासकीय अहवाल


| अ.क्र. | अनुक्रमणिका |
|---|---|
| १ | प्रस्तावना |
| २ | बाष्पके संचालनालयाचे उदिष्ट व ध्येय |
| ३ | बाष्पके संचालनालयाची विभागवार माहिती |
| ४ | विभागामार्फत देण्यात येणा-या महत्वाच्या सेवा |
| ५ | बाष्पके संचालनालयामार्फत महत्वाच्या धोरणात्मक बाबींवर घेतलेले निर्णय |
| ६ | बाष्पक नोंदणी निरीक्षण |
| ७ | प्रमाणपत्रांचे नूतनीकरण |
| ८ | बाष्पकांची नोंदणी बाष्पदाब चाचणी |
| ९ | नैमित्तिक भेटी (कॅज्यूअल व्हिजीटस) |
| १० | मितीपयोजकांचे नोंदणी निरीक्षण व नियतकालिक निरीक्षण |
| ११ | स्टीम, फीड व ब्लोडाऊन नलिकांचे निरीक्षण |
| १२ | सुट प्राप्त बाष्पके  (बेबी बाष्पके) |
| १३ | बाष्पक निर्मिती |
| १४ | व्हॉल्वस, माऊंटिंग्ज/फिटिंग्ज इत्यादींची माहिती |
| १५ | बाष्पक परिचर व बाष्पक परिचालन अभियंता परीक्षा |
| १६ | जमा व खर्चाचे विवरणपत्र |
| १७ | अपघात (बाष्पके अधिनियम,१९२३ मधील कलम २(अ) प्रमाणे) |
| १८ | विशेष बाबी |
| १९ | बाष्पके संचालनालय- एक दृष्टीक्षेप |

### ❖ प्रस्तावना ❖

बाष्पक हा शब्द "बॉयलर" या अर्थाने सामान्य जनतेला ज्ञात आहे. बाष्पक हे उपकरण पाण्यापासून वाफ निर्माण करते. या वाफेच्या दाबावर मोठमोठी यंत्रे गतिमान होतात. हे यंत्र जसे अतिशय उपयुक्त आहे तसेच अत्यंत स्फोटक व धोकादायक आहे. अपघात झाल्यास जिवित व वित्त हानी मोठया प्रमाणावर होऊ शकते. वाफेचे गुणधर्म आणि त्याच्या प्रचंड शक्तीचा अंदाज येत नसल्यामुळे तसेच या विषयाचे अपूर्ण ज्ञान असल्यामुळे, बाष्पक स्फोट होत असत. सन १८०० मध्ये अमेरिकेमध्ये झालेल्या बाष्पक स्फोटात १२०० लोकांचा जीव गेला आणि अमेरिकेत बाष्पकावर सखोल प्रयोग, निरीक्षण आणि संशोधन सुरु झाले. भारतात वाफेच्या इंजिनाचा प्रवेश सन १८२० मध्ये झाला, परंतु येथेही बाष्पकांचे वारंवार स्फोट होत होते. सन १८६३ मध्ये कलकत्ता येथे झालेल्या बाष्पक अपघातात १३ लोक दगावले. अशा भीषण प्रसंगाला सामोरे जात, त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन, बंगाल कायदा, १८६४ तयार करण्यात आला. सन १८६९ साली मुंबई शहरात बाष्पकामुळे २ भीषण अपघात झाले. त्यामध्ये जिवित व वित्त हानी मोठया प्रमाणावर झाली. या हादरवुन टाकणा-या बाष्पक स्फोटांनी "The Bombay Code of Boilers, १८६९" लागु करण्यात आला आणि त्याच वर्षी म्हणजेच सन १८६९ साली स्वतंत्रपणे मुंबई राज्याच्या बाष्पक तपासणी विभागाची स्थापना झाली. पुढे भारतीय बाष्पक अधिनियम, १९२३ हा कायदा राष्ट्रीय स्तरावर अस्तित्वात आला. २००७ मध्ये त्यामध्ये सुधारणा होऊन त्याला बाष्पके अधिनियम, १९२३ (सुधारीत - २००७) असे संबोधन्यात आले. बाष्पकाचे संकल्पचित्र, विनिर्देश प्रमाणपत्र, रेखाचित्र आणि बाष्पकाची निर्मिती, नोंदणी व निरीक्षण इ. बाबतचे विनियम अंतर्भूत केलेला भारत सरकारचा भारतीय बाष्पके विनियम,१९५० अस्तित्वात आला. त्यानंतर अधिनियमाच्या आधारे महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ व महाराष्ट्र मितीपयोजक नियम, १९६५ हे अस्तित्वात आले. आजमितीस वरील अधिनियम, विनियम व नियम यांची अंमलबजावणी बाष्पके संचालनालयाकडून महाराष्ट्र राज्यात केली जात आहे. हा विभाग गेली १५४ वर्षे यशस्वीरित्या काम करत आहे.

### ❖ उद्दिष्ट ❖

राष्ट्रीय हिताकरीता, जीव आणि मालमत्तेचे संरक्षण आणि संवर्धन करणे, तसेच राष्ट्रीय विकासाला गती देण्यास मदतीकरीता, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य मार्फत विविध बाष्पक अधिनियम/नियम/विनीयम यांची अमलबजावणी करणे.

### ❖ ध्येय ❖

- वापरात असलेल्या बाष्पकांची काटेकोरपणे तपासणी आणि जिवित व मालमत्तेचे बाष्पक स्फोटांपासून संरक्षण करणे.
- राष्ट्रीय विकासाच्या वृध्दी करीता, बाष्पकांचे उत्पादना दरम्यान दर्जेदार निरीक्षण करणे.
- बाष्पकांच्या सुरक्षित वापराकरीता बाष्पक परिचर आणि परिचालन अभियंत्यांची परीक्षा घेऊन सक्षम मनुष्यबळ तयार करणे.
- गतिमान, पारदर्शक सार्वजनिक देय व्यवस्थेच्या वचनबध्दतेसाठी, प्रक्रियांचे सुलभीकरण आणि संगणकासह आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.
- बाष्पक आणि प्रेशर व्हेसल्स यांची निर्मिती, तपासणी आणि अपघातांचे विश्लेषण या क्षेत्रांमध्ये अग्रगण्य निरीक्षण संस्था असे श्रेष्ठत्व जोपासण्याकरीता, आंतरराष्ट्रीय संस्थांशी बरोबरी करणे.
- सुपर क्रिटीकल बाष्पकांची निर्मिती/निरीक्षण या क्षेत्रामध्ये आधुनिक पध्दतींचा विकास करणे.
- सौर ऊर्जेवर चालणा-या बाष्पकांची निर्मिती करणा-या संस्थाना मदत आणि प्रोत्साहन देणे.
- बाष्पक संबंधी समूहामध्ये बाष्पकाच्या सुरक्षित आणि सक्षमपणे वापराकरीता जनजागृती निर्माण करणे.

### ❖ बाष्पके संचालनालयाची विभागवार माहिती ❖

बाष्पके संचालनालयाचे मुख्यालय हे मुंबई येथे असून, संचालक हे कार्यालय प्रमूख आहेत. या संचालनालयाच्या अधिपत्याखाली ०६ विभागीय कार्यालय असून, त्या विभागाच्या अंतर्गत येणारे कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी | प्रमुख अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | **बाष्पके संचालनालय,**<br>कामगार भवन, सातवा मजला, प्लॉट नं. सी-२०,ब्लॉक नं.-ई, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.<br>दूरध्वनी क्रमांक : ०२२-२६५७११५५ /१२०१/१३५२/<br>कार्यालयीन ई मेल : dirsb.mumbai@maharashtra.gov.in | संचालक,<br>(विभाग प्रमुख) | संपूर्ण महाराष्ट्र राज्य व मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | **सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय,**<br>कै. ना.म. लोखंडे, महाराष्ट्र श्रमविज्ञान संस्था, निवासी इमारत क्र.३, गायत्रीनगर, आयटी पार्कजवळ, व्हीएनआयटीच्या समोर, परसोडी, नागपूर-४४००२२.<br>दूरध्वनी क्रमांक: ०७१२-२२४२६८१/२२४७०९२<br>ईमेल: jtdirsb.nagpur@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, अकोला, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ, गोंदिया, अमरावती व वाशिम |
| ३ | **सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,**<br>कामगार कल्याण भवन, दुसरा मजला, चिंचवड, पुणे-४११०१९.<br>दूरध्वनी क्रमांक: ०२०-२७३७१६९७/१०५१<br>ईमेल: jtdirsb.pune@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | पुणे व सातारा |
| ४ | **सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांचे कार्यालय,**<br>"हरेश", १६, बिजली को.ऑप. हौसिंग सोसायटी, शिलाविहार जवळ, वसंत टेकडी, अहमदनगर-४१४००३<br>दूरध्वनी क्रमांक: ०२४१-२४२१७४५<br>ईमेल: jtdirsb.ahmednagar@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड. |
| ५ | **सहसंचालक, बाष्पके,महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे कार्यालय,**<br>गाळा क्र.४, उद्योग भवन, आयटीआय जवळ, त्रंबक रोड, सातपूर, नाशिक-४२२००७,<br>दूरध्वनी क्रमांक: ०२५३-२३६५३५७<br>ईमेल: jtdirsb.nashik@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | नाशिक, धुळे, नंदूरबार व जळगांव |
| ६ | **सहसंचालक, बाष्पके,महाराष्ट्र राज्य, कोल्हापूर यांचे कार्यालय,**<br>जुना राजवाडा, भवानी मंडप, कोल्हापूर-४१६००२<br>दूरध्वनी क्रमांक: ०२३१-२५४२९२०/९०९<br>ईमेल: jtdirsb.kolhapur@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी व सिंधुदूर्ग |
| ७ | **सहसंचालक, बाष्पके,महाराष्ट्र राज्य, सोलापूर यांचे कार्यालय,**<br>वितराग व्हर्टेक्स, पहिला मजला, ८३ ए, रेल्वे लाईन्स, नवल पेट्रोल पंपसमोर, डफरीन चौक, सोलापूर-४१३००१.<br>दूरध्वनी क्रमांक: ०२१७-२३१७०१५,<br>ईमेल: jtdirsb.solapur@maharashtra.gov.in | सहसंचालक, (प्रादेशिक प्रमुख) | सोलापूर, लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली. |

### ❖ विभागामार्फत देण्यात येणा-या महत्वाच्या सेवा ❖

- बाष्पक/मितोपयोजक यांचे नोंदणी निरीक्षण.
- बाष्पक/मितोपयोजक यांचे वार्षिक/द्विवार्षिक निरीक्षण.
- बाष्पक/मितोपयोजकांस अपघात झाल्यास चौकशी करणे.
- मालकी हक्काचे हस्तांतरण.
- बाष्पक मालकाने किंवा कंत्राटदाराने नवीन प्रकल्पांतर्गत नवीन पाईप लाईनची जोडणी/उभारणी तसेच जुन्या पाईपलाईनची दुरुस्ती किंवा बदली करणेसाठीचे निरीक्षण व मान्यता.
- बाष्पक, लहान औद्योगिक बाष्पक, मितोपयोजक व त्यांचे सुटे भाग, हिट एक्सचेंजर, प्रेशल व्हेसल यांचे निर्मिती दरम्यान निरीक्षण व प्रमाणीकरण.
- कास्टींगचे निर्मिती दरम्यान निरीक्षण व प्रमाणीकरण.
- फोर्जिंगचे निर्मिती दरम्यान निरीक्षण व प्रमाणीकरण.

- झडपा व उपकरणे (व्हॉल्वज/माऊटिंग/फिटींग्ज) निर्मिती दरम्यान निरीक्षण व प्रमाणीकरण.
- सांध्यात्याची (वेल्डर) चाचणी व पुर्नचाचणी.
- वेल्डींग इलेक्ट्रोडची आरंभीची व नियतकालीक चाचणी.
- बाष्पक/मितोपयोजक व त्याचे सुटे भाग यांची निर्मिती/दुरुस्ती, बाष्पकांच्या भागांची उभारणी, चाचणी प्रयोगशाळा, पाईप/टयूब, फौऊंड्री, फोर्जशॉप, झडपा, फिटींग, वेल्डिंग इलेक्ट्रोड यांचे निर्माते तसेच पाईप फॅब्रिकेटर इत्यादींच्या कार्यशाळेस मान्यता व त्यांचे वार्षिक नुतनीकरण.
- बाष्पक परिचालन अभियंता परीक्षा.
- प्रथम वर्ग बाष्पक परिचर परीक्षा.
- व्दितीय वर्ग बाष्पक परिचर परीक्षा.
- प्रमाणपत्राचे पृष्ठांकन व नक्कल प्रत.

### ❖ बाष्पके संचालनालयामार्फत महत्वाच्या धोरणात्मक बाबींबर घेतलेले निर्णय ❖

महाराष्ट्र शासनाच्या "मेक इन महाराष्ट्र" या योजने अंतर्गत व्यवसाय सुलभीकरण (ईझ ऑफ डुईंग बिझनेस) साध्य करण्याकरींता या संचालनालयाने बाष्पक वापर कर्त्यांसाठी खालील योजना उपलब्ध करून दिल्या आहेत.

| योजनेचा प्रकार | योजनेचा उददेश | दिल्या जाणा-या लाभाचे स्वरूप |
|---|---|---|
| ऐच्छिक | या योजनेकरीता सुरक्षेशी तडजोड न करता ज्या बाष्पके/मितीपयोजकाकरीता या योजनेचा पर्याय स्विकारण्यांत आलेला आहे त्या बाष्पके/मितीपयोजकांची तपासणी करण्यांकरीता निरीक्षण अधिकारी व सक्षम व्यक्ती यांच्या भेटी कमी करणे. | सदर योजना पाच वर्षासाठी लागू असेल व पाच वर्षातून एकदाच त्यांचे निरीक्षण (Random Inspection) होईल व दरवर्षी योजनेत भाग घेतलेल्या कारखान्यापैकी २०% कारखान्यांचे पाचवर्षातून एकदाच निरीक्षण होईल. |
| अ) | **स्वयं प्रमाणिकरण योजना** (Self Certification Cum-Consolidated Annual Return Scheme) : शासन निर्णय, उदयोग, उर्जा व कामगार विभाग क्रं -०४१५/प्र.क्र.२३/कामगार-१, दिनांक २४/०६/२०१५ अन्वये १००० वर्ग मीटर तपन क्षमता व त्यापेक्षा अधिक तपन क्षमता असलेल्या बाष्पके/मितीपयोजकांसाठी या योजनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. | |
| ब) | **त्रयस्थ आस्थापनांमार्फत निरीक्षण** (Third Party Inspection): बाष्पके अधिनियम, १९२३ मध्ये २००७ साली सुधारणा करण्यात आल्या. त्याअनुषंगाने सर्व प्रकारच्या बाष्पकांच्या निरीक्षणाकरीता केंद्रीय बाष्पक मंडळाने मान्यता दिलेल्या त्रयस्थ आस्थापनांमार्फत तसेच स्वतंत्र सक्षम व्यक्तीव्दारे बाष्पकांचे निरीक्षण व प्रमाणीकरणाची परवानगी देण्यांत आली आहे. | |

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लोकसेवा:

दिनांक २६/०१/२०१६ पासून दोन सेवा, तसेच दि.२९/६/२०१६ पासून आणखी दोन सेवा या कार्यालया मार्फत ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या होत्या. त्याचप्रमाणे दि.२०/६/२०१७ पासून आणखी अठरा सेवा वरील अधिनियमांतर्गत ऑनलाईन उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्याचा विहित कालावधी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मालकी हक्काचे हस्तांतरण | ७ दिवस | तांत्रिक/निरीक्षण शाखेचा तांत्रिक अधिकारी/अधिक्षक | सहसंचालक,बाष्पके, मुंबई/प्रादेशिक कार्यालये | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २ | प्रमाणपत्राची नक्कल प्रत | ७ दिवस | तांत्रिक/निरीक्षण शाखेचा तांत्रिक अधिकारी/अधिक्षक | सहसंचालक,बाष्पके, मुंबई/प्रादेशिक कार्यालये | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ३ | बाष्पके व मितीपयोजकांची नोंदणी, | | संबधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| अ) | महाराष्ट्र राज्यात निर्मित, | ४३ दिवस | | | |
| आ) | महाराष्ट्र राज्याबाहेर निर्मित | ५० दिवस | | | |
| ४ | बाष्पके व मितीपयोजकांच्या प्रमाणपत्राचे नुतणीकरण | १७ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ५ | बाष्पके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ६ | बाष्पके निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ७ | बाष्पके/मितीपयोजके उभारणीची मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ८ | बाष्पके/मितीपयोजके उभारणीच्या मान्यतेचे नुतनीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ९ | मितीपयोजके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १० | मितीपयोजके निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ११ | प्रेशर व्हेसल्स निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | प्रेशर व्हेसल्स निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १३ | प्रेशर पार्टस निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १४ | प्रेशर पार्टस निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १५ | हिट एक्सचेंजर निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १६ | हिट एक्सचेंजर निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १७ | स्मॉल इंडस्ट्रियल बाष्पके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १८ | स्मॉल इंडस्ट्रियल बाष्पके निर्मात्यांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १९ | बाष्पके व मितीपयोजक दुरुस्तीकारांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २० | बाष्पके व मितीपयोजक दुरूस्तीकारांच्या मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २१ | पाईप फॅब्रिकेटर म्हणून मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २२ | पाईप फॅब्रिकेटर म्हणून मान्यतेचे नुतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

### ❖ बाष्पक नोंदणी निरीक्षण ❖

अहवालांकित वर्षात महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण **३४५** नवीन बाष्पकांची नोंदणी झाली. यामध्ये **५०** लघु औद्योगिक बाष्पकांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यातून **२४** बाष्पके निरनिराळ्या राज्यात स्थानांतर होऊन गेली, तर **२५** बाष्पके निरनिराळ्या राज्यातून या राज्यात स्थांनातरीत होऊन आली.

### ❖ प्रमाणपत्रांचे नुतनीकरण ❖

अहवालांकित वर्षात एकुण **४०५८** बाष्पकांना पुढील वापरासाठी प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली. त्यामध्ये पहिली नोंदणी बाष्पचाचणी घेतल्यानंतर निर्गमित करण्यात आलेल्या एकूण **२०४** प्रमाणपत्रांचा समावेश आहे. तसेच अधिनियमामधील नियम-३७६ (फफ) व ३७६ (फफफ) अनुसार निरीक्षण करण्यात आलेल्या **१११** बाष्पकांचा समावेश आहे. भारतीय सेनादलाच्या मालकीच्या **३७** बाष्पकांना प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली.

अहवालांकित वर्षात निरीक्षण केलेल्या बाष्पकांपैकी **७९०** बाष्पकांना आवश्यक तेथे दुरूस्त्या करण्यात आल्या. तसेच **१२६** बाष्पकांना, बाष्पकांच्या स्थितीमुळे व मालकांच्या विनंतीनुसार अल्प मुदतीचे प्रमाणपत्रे देण्यात आली. १८ बाष्पकांच्या बाबतीत बाष्पक मालकांनी पुढील निरीक्षण व जलदाब चाचणीसाठी सादर न केल्यामुळे प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आलेली नाहीत. तसेच बाष्पक अधिनियम-१९२३ च्या कलम-३४, उपकलम-२ अन्वये कलम-६ च्या खंड-क उपबंधाच्या अंमलबजावणीतून **०२** बाष्पकांना सूट देण्यात आली आहे.

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत **नुतनीकरणानंतर प्रमाणपत्रे** निर्गमित केलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्यात दर्शविलेली आहे.

| प्रमाणपत्राचे स्वरुप | वर्ष | विभाग | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | नागपूर | पुणे | अहमद नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | |
| नुतनीकरणानंतर | २०२०-२१ | १०४५ | ४४४ | ६२६ | ३५४ | २९२ | ५८९ | १९८ | ३५५० |
| | २०२१-२२ | १०४९ | ४९६ | ६३५ | ३६० | ४१८ | ५८० | २२२ | ३७६० |
| | **२०२२-२३** | **१०९६** | **५०१** | **५९१** | **३८०** | **४३१** | **५२८** | **२१६** | **३७४३** |

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत **विनियम ३७६ (फफ/(फफफ)** नुसार प्रमाणपत्रे निर्गमित केलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्यात दर्शविलेली आहे.

| प्रमाणपत्राचे स्वरुप | वर्ष | विभाग | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | नागपूर | पुणे | अहमद नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | |
| विनियम ३७६ (फफ/(फफफ) नुसार प्रमाणपत्रे | २०२०-२१ | ९७ | १९ | ० | ४ | ३ | ० | ० | १२३ |
| | २०२१-२२ | ६१ | १९ | ० | ० | २ | ३ | ० | ८५ |
| | **२०२२-२३** | **७४** | **२१** | **०** | **१** | **३** | **१२** | **०** | **१११** |

अहवालांकित वर्षात व मागिल दोन वर्षाच्या कालावधीत, नवीन बाष्पकांचे नोंदणी निरीक्षण व नोंदणी जलदाब चाचणी, तसेच निरीक्षण व जलदाब चाचणी केल्यानंतर **तात्पुरते आदेश** निर्गमित केलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

| आदेशांचे स्वरुप | वर्ष | बृहन्मुंबई, रायगड, पालघर व ठाणे | नागपूर | पुणे | अहमद नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रथम तात्पुरते आदेश | २०२०-२१ | २६९ | ११६ | ८१ | ७८ | ७८ | ७७ | ८८ | ७८७ |
| | २०२१-२२ | २९२ | १३५ | ७१ | ९२ | ९४ | १४० | ९३ | ९१७ |
| | **२०२२-२३** | **३१३** | **१६४** | **२१०** | **१२२** | **११३** | **२००** | **१३६** | **१२५८** |

तसेच अहवालांकित वर्षात निरीक्षण व जलदाब चाचणी न घेता सहा महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात आलेल्या तात्पुरत्या आदेशांची संख्या **७३९** आहे.

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत **"बाष्पके अधिनियम, १९२३ च्या कलम ३४, उपकलम २ अन्वये कलम ६ च्या खंड (क) उपबंधाच्या अंमलबजावणी अन्वये"** सुट देण्यात आलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्यात दर्शविलेली आहे.

| परवानगी पत्राचे स्वरुप | वर्ष | विभाग | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | नागपूर | पुणे | अहमद नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | |
| कलम ६ (क) अन्वये सुटप्राप्त बाष्पके | २०२०-२१ | ७ | ३ | ० | ० | ० | ० | ० | १० |
| | २०२१-२२ | ७ | १ | ० | १ | ० | ० | ० | ९ |
| | **२०२२-२३** | **२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत **सुट प्राप्त बाष्पकांच्या** (MR/EX) निरीक्षणाअंती परवानी पत्रे देण्यात आलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्यात दर्शविलेली आहे.

| परवानगी पत्राचे स्वरुप | वर्ष | विभाग | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | नागपूर | पुणे | अहमद नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | |
| सुट प्राप्त (MR/EX) बाष्पके | २०२०-२१ | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| | २०२१-२२ | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| | **२०२२-२३** | **५** | **०** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **८** |

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत **चालु असलेल्या बाष्पकांची** विभागवार संख्या खाली तक्त्यात दर्शविलेली आहे.

| | वर्ष | विभाग | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | नागपूर | पुणे | अहमद नगर | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | |
| एकुण चालु बाष्पके | २०२०-२१ | १४२२ | ५८२ | ७०७ | ४३६ | ४७३ | ६६६ | २८६ | ४५७२ |
| | २०२१-२२ | १४१३ | ६५१ | ७०६ | ४५३ | ५१४ | ७२३ | ३१५ | ४७७५ |
| | **२०२२-२३** | **१४९०** | **६८६** | **८०४** | **५०३** | **५४७** | **७४०** | **३५२** | **५१२२** |

अहवालांकित वर्षात आणि मागील २ वर्षात निरीक्षण करून प्रमाणित केलेल्या व तात्पुरते आदेश देण्यात आलेल्या **निरनिराळ्या प्रकारच्या बाष्पकांची** आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाष्पकांचे प्रकार | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|
| १ | स्मॉल इंडस्ट्रीयल बॉयलर (SIB) | ३१८ | ३२९ | **३७४** |
| २ | स्मोक ट्युब | २५९० | २६८० | **२७६९** |
| ३ | कंपोझिट | ४८० | ६०० | **७६३** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | वॉटर ट्युब (युटीलीटी वगळून) | ७९४ | ७८७ | **८२७** |
| ५ | वेस्ट हिट | २०१ | २२३ | **२१८** |
| ६ | थर्मीक फ्लुईड हिटेड स्टिम जनरेटर | ६२ | ४५ | **९५** |
| ७ | युटीलिटी (उर्जा निर्मिती केंद्रातील) | ६४ | ५८ | **४६** |
| ८ | सुपर लँकेशायर/लँकेशायर/कोचरन | ४ | १ | **१** |
| ९ | कॉर्निश/मरीन | १ | १ | **१** |
| १० | लोकोमोटीव्ह | १ | १ | **१** |
| ११ | व्हर्टिकल क्रॉस ट्युब | ४२ | ३४ | **४** |
| १२ | इलेक्ट्रोड | १० | १० | **१६** |
| १३ | कॉईल टाईप फोर्स्ड सर्क्यूलेशन (एसआयबी वगळून) | ५ | ६ | **७** |
| | **एकूण :** | **४५७२** | **४७७५** | **५१२२** |

अहवालांकित वर्षात व मागील २ वर्षात निरीक्षण करून प्रमाणित केलेल्या व तात्पुरते आदेश देण्यात आलेल्या निरनिराळ्या **तपनक्षमतेच्या (चौरस मिटरमध्ये) बाष्पकांचा** तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **बाष्पकांचे प्रकार** | **२०२०-२१** | **२०२१-२२** | **२०२२-२३** |
|---|---|---|---|---|
| १ | स्मॉल इंण्डस्ट्रीअल बॉयलर | ३१८ | ३२९ | **३७४** |
| २ | बाष्पक तपन क्षमता १ चौ.मि.च्या पुढे व १००० चौ.मि.पेक्षा कमी | ३६९० | ३७६८ | **४०२०** |
| ३ | बाष्पक तपन क्षमता १००० चौरस मिटर व त्यापेक्षा अधिक | ५६४ | ६७८ | **७२८** |
| | **एकूण :** | **४५७२** | **४७७५** | **५१२२** |

बाष्पकांना बारा महिन्यापेक्षा कमी मुदतीसाठी खालील कारणासाठी **अल्प मुदतीची प्रमाणपत्रे** (STC) देण्यात आली.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **बाष्पकांची संख्या** |
|---|---|---|
| १ | सामूहिक निरीक्षणासाठी | ० |
| २ | बाष्पकांच्या स्थितीमुळे | ६ |
| ३ | मालकांच्या इच्छेनुसार | १२० |
| | **एकूण :** | **१२६** |

अहवालांकित वर्षात महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ मधील नियम-३८ अन्वये एकूण **०१** प्रमाणपत्राची नक्कल प्रत देण्यात आली.

बाष्पक चालु असतांना त्यास हानी पोहचल्याचे दिसून आल्याने बाष्पक अधिनियम १९२३, कलम ११ पोटकलम (ब) अन्वये एकूण **०६** बाष्पकांची प्रमाणपत्रे काढुन घेण्यात आली.

तसेच अधिनियम १४ (२) अन्वये नियुक्त केलेल्या तारखेस मालकांनी बाष्पक, विहित निरीक्षणासाठी तयार न ठेवल्यामुळे भेटी निष्फळ ठरल्या असे अहवालांकित वर्षात एकूण **१६** प्रकरणे घडली आहेत. सबब अशा सर्व प्रकरणांत नव्याने फी आकारण्यात आली आहे.

कंपनीच्या उत्पादनावर परिणाम होऊ नये म्हणुन बाष्पक मालकास जेव्हा त्यांचे बाष्पकाचे तसेच मितिपयोजकाचे निरीक्षण तातडीने करुन घेणे आवश्यक वाटते तेव्हा त्यांचे खास विनंतीवरुन महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ मधील नियम १६ अन्वये शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटटींच्या दिवशी तसेच सुर्यास्तानंतर विशेष भेटीचे आयोजन करण्यात येते. चालू वर्षी विशेष भेटी अन्वये एकूण **२३३** निरीक्षणे हि अतिरिक्त फी आकारुन करण्यात आली.

अहवालांकित वर्षाच्या कालावधीत व मागील २ वर्षात बाष्पकांची केलेली एकूण निरीक्षणे व जलदाब चाचणी इत्यादी बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| सन | अंतर्गत व बाहय निरीक्षण | स्तंभ (२) साठी पुढील निरीक्षणे ज्यासाठी अतिरिक्त फि आकारण्यात आली नाही | गळती निरीक्षण | दुरुस्ती अंतर्गत निरीक्षण | जलदाब चाचणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २०२०-२१ | ४३२६ | ४३५ | ९० | ६६२ | ४११४ |
| २०२१-२२ | ४६३३ | ४०७ | ९१ | ६९० | ४२५६ |
| **२०२२-२३** | **४८११** | **५२५** | **७४** | **७९९** | **५२४०** |

### ❖ नवीन बाष्पकांची नोंदणी बाष्पदाब चाचणी ❖

अहवालांकित वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत नवीन बाष्पकांकरीता पहिली नोंदणी बाष्पचाचणी घेतल्यानंतर बाष्पकांना प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आल्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| सन | बाष्पकांची बाष्पदाब चाचणी |
|---|---|
| २०२०-२१ | १३९ |
| २०२१-२२ | १९१ |
| **२०२२-२३** | **२०४** |

चालु बाष्पकांचे सेफ्टी वॉल्व काही कारणास्तव बदली केले असल्यास, बदललेले सेफ्टी व्हॉल्व सेट करण्यासाठी बाष्पकांची बाष्पदाब चाचणी घेण्याकरीता भेट देण्यात येते. अहवालांकित वर्षामध्ये अशा एकुण **५१** बाष्पदाब चाचण्या करण्यात आल्या.

### ❖ नैमित्तिक भेटी (कॅज्यूअल व्हिजीटस) ❖

नैमित्तिक भेटी या शिर्षाखाली अधिका-यांनी निरनिराळ्या मिल्स, कंपनी वगैरेना भेटी देऊन तेथील चालू किंवा बंद स्थितीत तपासणी केलेल्या बाष्पकांची आकडेवारी खाली दिलेली आहे. तसेच बाष्पक अधिनियम व त्याखालील नियमांच्या तरतुदीनुसार बाष्पके चालतात किंवा नाही हे पाहण्यासाठी दिलेल्या भेटींचा अंतर्भाव केलेला आहे.

| सन | नैमित्तिक भेटी |
|---|---|
| २०२०-२१ | ४४८ |
| २०२१-२२ | ४९० |
| **२०२२-२३** | **५६९** |

अधिका-यांच्या नियोजीत भेटी दरम्यान, परिसरातील कारखान्यांना भेटी देऊन, जर त्या कारखान्यांमध्ये अनाधिकृत किंवा बेकायदेशीर बाष्पक आढळल्यास, अशा बाष्पकांना प्रतिबंधीत करुन, बाष्पके अधिनियम व नियमांनुसार निरीक्षण करुन घेण्यास सांगितले जाते. यानुसार अहवालांकीत वर्षामध्ये एकूण **२८ अनाधिकृत बाष्पके आढळली. त्यानुसार या बाष्पकांना** प्रतिबंधीत आदेश तसेच बाष्पकांची धारण क्षमता चाचणी करणेबाबत सुचना निर्गमित करणेत आल्या.

अहवाल कालावधीत एकूण १९०२ बंद बाष्पके आहेत. निरीक्षण अधिकारी अशा बाष्पकांना विभागातील निरीक्षणाच्या वेळी नैमित्तिक भेटी देऊन, ती बंद आहेत याची खात्री करून घेतात व त्याची नोंद स्मरणपुस्तिकेत घेण्यात येते.

### ❖ मितीपयोजकांचे नोंदणी निरीक्षण व नियतकालिक निरीक्षण ❖

चालू अहवाल कालावधीत एकूण ०८ नवीन मितीपयोजकांचे नोंदणी निरीक्षण करण्यात आले. प्रमाणपत्रांच्या नुतनीकरणासाठी भेटी देऊन, निरीक्षण व जलदाब चाचणी घेतल्यानंतर, ३६ मितोपयोजकांना तात्पुरते आदेश देण्यात आले व एकूण १५३ मितोपयोजकांना प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आली. तसेच अहवाल कालावधीत बंद असलेली १२८ मितीपयोजके आहेत.

### ❖ स्टीम, फीड व ब्लो डाऊन नलिकांचे निरीक्षण ❖

बाष्पक/मितीपयोजकांच्या निरीक्षणाशिवाय बाष्पक आणि मितीपयोजक यांच्या वापरात येणाऱ्या स्टीम, फीड व ब्लो डाऊन नलिका व ट्युबचे निरीक्षणही केले जाते. या निरीक्षणासाठी दिलेल्या भेटीचा तपशिल खालील/पुढील तक्त्यात दिला आहे.

| सन | एकूण भेटी | नलिकांचे निरीक्षण | नलिकांचे वेल्ड प्रिपरेशन निरीक्षण | नलिकांची जलदाब चाचणी | १०० मि.मि. व्यासापर्यंत लांबी (मिटर्समध्ये) | १०० मि.मि. व्यासापेक्षा जास्त लांबी (मिटर्समध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|
| २०२०-२१ | १९५३ | ६९० | ६९२ | ५७१ | ७७४९४ | ३८०३६ |
| २०२१-२२ | २३६० | ९१६ | ७७५ | ६६९ | ११०८०७ | ४३५६२ |
| २०२२-२३ | २६८६ | ९५७ | ८७० | ८५७ | ११५३२० | ३५५१० |

### ❖ सुटप्राप्त बाष्पके (बेबी बाष्पके) ❖

| वर्ष | मुंबई | नागपूर | पुणे | अहमद नगर | नाशिक | सोलापूर | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१.३.२०२२ पर्यंत अभिलेख्याप्रमाणे असलेली प्रकरणे | २३६९ | ४८ | १९१ | ५८ | ५० | ८ | २९५ | **३०१९** |
| २०२२-२३ मध्ये देण्यात आलेली नाहरकत प्रमाणपत्रे | २९ | ३ | १५ | २ | ९ | १ | २ | **६१** |

### ❖ बाष्पक निर्मिती ❖

निर्मितीखाली असलेल्या बाष्पकांचे निरीक्षण करणे व ते प्रमाणित करणे हे या संचालनालयाच्या कामाचे महत्त्वाचे अंग आहे. बाष्पकांच्या निरीक्षणासाठी संचालनालयातील अधिका-यांनी दिलेल्या भेटीची संख्या, निर्मीती केलेल्या बाष्पकांची संख्या इत्यादींचा या वर्षाचा व मागील दोन वर्षाचा तपशिल खालील तक्त्यात दर्शविला आहे.

| सन | निरीक्षणासाठी दिलेल्या भेटींची संख्या | निर्मिती करण्यात आलेली बाष्पके व इतर पार्ट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बाष्पके | लघु औद्योगिक बाष्पके | मितीपयोजके | हिटएक्सचेंजर | प्रेशर व्हेसल्स | प्रेशर पार्ट |
| २०२०-२१ | ३७४५ | ७३८ | ५८ | ७० | १९ | ५६ | ११५२ |
| २०२१-२२ | ४०९५ | ९५४ | ९० | ३० | ०८ | १६१ | २०४९ |
| २०२२-२३ | ४५९२ | ९४७ | ८० | ३८ | ३५ | १३८ | २५६१ |

### ❖ व्हॉल्वस, माऊंटिंग/फिटिंग्ज इत्यादीची माहिती ❖

विनियमाप्रमाणे राज्यातील विविध कंपन्यांनी निर्मिती केलेल्या बाष्पक माउटिंग्ज आणि फिंटीग्जचे तसेच विविध प्रकारच्या झडपा व उपकरणे इत्यादींचे निरीक्षण करण्याचे काम या संचालनालयामार्फत केले जाते.

यासाठी दिलेल्या भेटींची संख्या व निरीक्षण करून प्रमाणित केलेल्या झडपा व उपकरणे यांची संख्या खालील तक्त्यात व्यासानुसार तपशिलवार दिली आहे.

**व्हॉल्वस, माऊंटिंग/फिटिंग्ज व्यासानुसार निर्मीती (मि.मि. मध्ये)**

| वर्ष | निरीक्षणा साठी भेटी | २५ मिमि पर्यंत | २५ मिमि पेक्षा जास्त ५० मिमि पर्यंत | ५० मिमि पेक्षा जास्त १०० मिमि पर्यंत | १०० मिमि पेक्षा जास्त १५० मिमि पर्यंत | १५० मिमि पेक्षा जास्त २५० मिमि पर्यंत | २५० मिमि पेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०२०-२१ | ९३१ | २१८९३१ | ११९५८८ | ५९९१० | ११९८० | १९२२६ | ५८१३ | **४३५४४८** |
| २०२१-२२ | १७१५ | २३१३५४ | ८८०४९ | ५७८३६ | २४१८३ | ११०७९ | ५६३३ | **४१८१३४** |
| २०२२-२३ | १४२५ | २५७२१५ | १०५१९५ | ६९६३३ | ३०९१२ | ६८९६ | ६७४४ | **४७६५९५** |

### ❖ बाष्पक परिचर व बाष्पक परिचानल अभियंता परीक्षा ❖

| परीक्षेचे नांव | परीक्षेत बसलेल्या उमेदवारांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची संख्या | उत्तीर्ण प्रमाण |
|---|---|---|---|
| बाष्पक परिचालन अभियंता | ६१५ | २२१ | **३५.९३** |
| प्रथम वर्ग बाष्पक परिचर क्षमता परीक्षा | ११२५ | ६१७ | **५४.८४** |
| द्वितीय वर्ग बाष्पक परिचर क्षमता परीक्षा | १२७३ | ८१२ | **६३.७९** |

### ❖ सांध्यात्यांची (वेल्डर्स) प्रमाणपत्र परिक्षा ❖

अहवाल वर्षात भारतीय बाष्पक विनियम, १९५० नुसार एकुण **१३** सांध्यात्यांना (वेल्डर्स) प्रमाणपत्रे देण्यात आली.

### ❖ बाष्पके अधिनियम, १९२३ मधील कलम ३४, ६ (क) च्या तरतुदीपासून बाष्पकांना सूट ❖

बाष्पके अधिनियम, १९२३ मधील कलम ३४ च्या अनुषंगाने खालील नमुद केलेल्या बाष्पकांना त्यांच्या समोर दर्शविलेल्या कालावधीसाठी कलम ६ (क) च्या तरतुदीपासून सूट देण्यात आली.

| क्रमांक | कंपनीचे नाव | बाष्पक क्रमांक | सुट मंजुर केलेला कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., मुंबई रिफायनरी, माहुल, मुंबई-७४ | एमआर/११५३६ | ०९/०५/२०२२ ते ०८/०५/२०२३ |
| २ | मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., मुंबई रिफायनरी, माहुल, मुंबई-७४ | एमआर/७८०४ | ०६/०९/२०२२ ते ०५/०९/२०२३ |

### ❖ जमा व खर्चाचे विवरण पत्र ❖

या संचालनालयाचा एकूण जमा होणारा महसूल तसेच योजनेतर व योजनाअंतर्गत खर्च खालील प्रमाणे आहे. ( महालेखापाल कार्यालयाच्या नोंदीशी केलेल्या पडताळणीप्रमाणे )

| वर्ष | जमा महसुल रुपये | योजनेत्तर खर्च रुपये | योजनांतर्गत खर्च रुपये | जमेच्या तुलनेत होणारा खर्च % |
|---|---|---|---|---|
| २०२०-२१ | ९६९६९४९२ | ६८४९८२९८ | ५१८२१८४ | **७५.९८** |
| २०२१-२२ | ११८५३६२५९ | ८२९५७५२८ | १७६८२७८ | **७१.४८** |
| २०२२-२३ | १२९४१५९६० | ९३८४३७३० | ६०८७१८७ | **७७.२१** |

**❖ अपघात (बाष्पके अधिनियम,१९२३ मधील कलम २(अ) प्रमाणे) ❖**

"अपघात" म्हणजे बाष्पकाचा किंवा बाष्पनलिकेचा स्फोट किंवा बाष्पक वा बाष्पनलिका यांची कुवत कमी होऊन किंवा त्यामधून प्रमाणाबाहेर पाणी किंवा वाफेची गळती होऊन, ज्यामुळे त्यात स्फोट होऊन, मनुष्यहानी किंवा मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण होईल, अशा स्वरूपाचे कोणतेही बाष्पकाचे किंवा बाष्पनलिकेचे झालेले नुकसान.

| वर्ष | अपघात | जिवीत हानी (मृत व्यक्तींची संख्या) | दुखापत/भाजलेल्या व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|
| २०२०-२१ | ०४ | ०० | ०० |
| २०२१-२२ | ०२ | ०० | ०० |
| २०२२-२३ | ०६ | ०५ | ०३ |

सन २०२२-२३ या वर्षाच्या कालावधीत एकुण ०६ बाष्पकांस अपघात झाला. अपघातांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:

१) मे.ए.ए.एनर्जी लि., देसाईगंज, वडसा, जि.गडचिरोली, जिल्हा नागपूर येथील बाष्पक क्र.एमआर/१४८८५ ला दि.२७/१०/२०२२ रोजी सकाळी ४:०० वाजता बाष्पकाचा हाय प्रेशर प्रायमरी सुपरहिटर आऊटलेट ते सेकंडरी सुपरहिटर इनलेटला जोडणा-या पाईपाचे तापमान त्याच्या क्षमतेपेक्षा अधिक वाढल्याने पाईप फुटून हा अपघात झाला. अपघाताची प्राथमिक चौकशी करण्याकरीता श्री. ध. प्र. अंतापरकर, संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे दि.२७/१०/२०२२ रोजी दुपारी ४:०० वाजता गेले असता, कंपनीमध्ये बाष्पक क्र.एमआर/१४८८५ चा हायप्रेशर प्रायमरी सुपरहिटर आऊटलेट ते सेकंडरी सुपरहिटर इनलेटला जोडणा-या पाईपचे तापमान त्याच्या क्षमतेपेक्षा अधिक वाढल्याने पाईप फुटून हा अपघात घडल्याचे निदर्शनास आहे. अपघातामध्ये तीन जखमी व्यक्तीपैकी दोन कामगार किरकोळ जखमी व एक कामगार रुग्णालयात हदयविकाराच्या झटक्याने मृत पावले. कंपनीवर भारतीय बाष्पके अधिनियम १९२३ च्या खंड ६ (ई) आणि बाष्पक परिचालन, २०२१ च्या नियम ३, ४ व ७ नुसार प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, वडसा येथे न्यायालयीन खटला दाखल करण्यात आला आहे.

२) मे. मुळा सहकारी साखर कारखाना लि., सोनाई, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर या कारखान्याचा बाष्पक क्र.एमआर/१३३२३ यांस दिनांक ५/१२/२०२२ रोजी सकाळी ६:१८ वाजता अपघात झाला. सदरील अपघाताविषयी समजल्यानंतर श्री.न. ग. भोईटे, सह संचालक, अहमदनगर यांनी दिनांक २५/१२/२०२२ रोजी अपघाताची चौकशी करणेकरीता कारखान्याला भेट दिली. सदरहु अपघाताची सखोल चौकशी केल्यानंतर बाष्पकाच्या पाण्याच्या ड्रमला उजव्या बाजुनी जोडलेला डाऊनकमर पाईप सतत गरम राखेमध्ये असल्यामुळे पाईपचे तापमान क्षमतेपेक्षा जास्त वाढल्यामुळे पाईप फुटून हा अपघात झाला. या अपघातामध्ये एक सफाई कामगार गंभीररित्या जखमी झाला आणि रुग्णालयामध्ये उपचार घेत असतांना मृत पावला.

३) मे. विशाल डेअरी, मौजे उमरी, तालुका कैज, जिल्हा बीड येथील बाष्पक क्र.एमआर/१७३२० ला वार्षिक निरीक्षणाकरीता श्री. स्व. अ. राजूरकर, उपसंचालक, बाष्पके संचालनालय, अहमदनगर यांनी भेट दिली असता, त्यांच्या असे निदर्शनास आले की फर्नेसला पाच ठिकाणी व आय आर सी ला एका ठिकाणी फुगवटा आल्याचे आढळले. सदरहू अपघाताची सखोल चौकशी केल्यानंतर बाष्पकातील पाण्याची पातळी वाजवीपेक्षा कमी झाल्यामुळे फर्नेस आणि आयआरसी ला फुगवटा येऊन सदरहू

अपघात झाला असे निष्कर्षास आले. बाष्पकांचे स्वयंचलित उपकरणे चालु नसल्याने हा अपघात झाला. या अपघातात कोणतीही जिवीत हानी वा वित्तीय हानी झाली नाही.

४) मे. रिहांश फूड, गट नंबर १२२, २ ए, पिंपलगाव रोड, आंबेगाव, मंचर सिटी, जिल्हा पुणे येथील बाष्पक क्रमांक एमआर/एस- १७९९४ ला दि. १६ एप्रिल, २०२२ रोजी सकाळी ३.०० वाजता बाष्पकच्या पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे फरनेस जास्त गरम झाल्यामुळे फरनेसला वरील बाजूस फुगवटा येवून हा अपघात झाला. अपघाताची प्राथमिक चौकशी करण्याकरिता श्री. महेश रा. देशमुख, उपसंचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे दि. २५ एप्रिल, २०२२ रोजी गेले असता सदर अपघात हा पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे फरनेस ला फुगवटा आला असे निदर्शनास आले. सदर अपघातामध्ये कोणतीही जीवितहानी अथवा कोणीही जखमी झाले नाही.

५) मे. महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लि., वेस्ट हिट रिकव्हरी प्रोजेक्ट, गॅस टर्बाईन पॉवर स्टेशन, उरण, जि. रायगड-४००७०२ येथील बाष्पक क्रमाक एमआर/१२०१८ ला दिनांक ०९/१०/२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता अपघात झाला. अपघाताची प्राथमिक चौकशी करण्याकरीता श्री. सं.श. सोळंके, उपसंचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक १०/१०/२०२२ रोजी सकाळी ९.३० वाजता अपघात स्थळी भेट दिली असता सदर बाष्पकाचा हाय प्रेशरवॉटर सर्क्युलेटींग पंप फुटून हा अपघात घडल्याचे प्रथमदर्शनी निर्देशनास आले. सदर अपघातामधील चार जखमी व्यक्तींपैंकी एक कर्मचारी किरकोळ जखमी व तीन कर्मचारी रुग्णालयात मृत पावले. सदर अपघाताची पुढील चौकशी करण्याकरीता बाष्पके अधिनियम, १९२३ मधील कलम १८ उपकलम ३ अन्वये आणि बाष्पके अपघात चौकशी नियम - २०२१ अन्वये अपघात चौकशी समिती गठीत करण्यात आली व सदर समितीचा चौकशी अहवाल केंद्रीय बाष्पक मंडळाला सादर करण्यांत आला.

६) मे. स्टार इंडिया एन्टरप्रायजेस, कानेरवाडी, तालका करविर, जिल्हा कोल्हापूर यांच्या मालकीचा बाष्पक क्र.एमआर/एस-१५८८६ ला दि.२४/०२/२०२३ रोजी सकाळी ११ वाजुन ३५ मि. वाजेला अपघात झाला. सदरील अपघाताविषयी समजल्यानंतर श्री.सु. बा. देशपांडे, उप संचालक, कोल्हापूर यांनी दिनांक २८/०२/२०२३ रोजी अपघाताची चौकशी करणेकरीता कारखान्याला भेट दिली. श्री.सु. बा. देशपांडे, उप संचालक, कोल्हापूर यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये असे आढळून आले की, बाष्पकाच्या फर्नेस शेल प्लेटला लो वॉटर लेवलमुळे वरील बाजुस फुगवटा आला आहे. तसेच कारखान्यास सदर फुगवटा झालेला फर्नेस शेल कट करुन बदली करण्याबाबत सुचविण्यात आले. सदर अपघातात कोणत्याही प्रकारची इजा तथा जिवीत हानी झालेली नाही.

### ❖ स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमीत्त ठरविलेली ध्येय व उद्दिष्टे ❖

केंद्र सरकारने भारताच्या स्वातंत्र्य दिवसाचा ७५वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात " स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला होता व भारतातील विविध राज्यांनी तसेच केंद्रशासित प्रदेश यांनी देखील स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव स्थानिक पातळीवर गावोगावी साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार मा.ना.डॉ.सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून, श्रीमती विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव, कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने व सहकार्याने व श्री ध. प्र. अंतापूरकर, संचालक बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वात बाष्पके संचालनालयाने खालील नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्याचे ठरविले आहे.

१) महाराष्ट्र राज्यातील कमीत कमी ७५ अभियांत्रिकी महाविद्यालये / तंत्रनिकेतन महाविद्यालये / आय.टी.आय. / शाळा / महाविद्यालय / टेक्निकल स्कूल येथे बाष्पके उद्योगातील रोजगाराच्या संधी या विषयावर अधिका-यांमार्फत परिसंवादाचे आयोजन

२) बाष्पके संचालनालयात येणाऱ्या अभ्यागतांना स्वातंत्र्यवीरांचे तसेच राष्ट्र-पुरूषांचे चारित्रात्मक व स्वातंत्र्य चळवळीची पुस्तके मोफत वाचण्याकरीता उपलब्ध करून देणे.

३) ऊर्जेची बचत व प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने, बाष्पक अधिक कार्यक्षमतेने चालवण्याच्या दृष्टीने ७५ बाष्पकांची कार्यक्षमता ३% वाढवण्याची वचनबद्धता.

४) बाष्पके उद्योगाला चालना देण्याकरिता तसेच बाष्पकाचा सुरक्षित व कार्यक्षम वापर करण्यांकरिता आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे / चर्चासत्राचे आयोजन करण्याचे उद्दिष्ठे.

५) बाष्पके संचालनालयाचे कामे ई - ऑफिस मध्ये परावर्तित करण्याचे उद्दिष्ठे.

**❖ विशेष बाबी ❖**

या संचालनालयाचे "गतीमान, पारदर्शक सार्वजनिक देय व्यवस्था, प्रक्रियांचे सुलभिकरण आणि संगणकासह आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब" हे ध्येय साध्य करणेसाठी सर्व कार्यालयांचे संपुर्ण संगणकीकरण हे उद्यीष्ठ ई-ऑफिस द्वारे साध्य करणेचे योजिले आहे. त्यानुसार कार्यालयातील पत्रव्यवहार व अभिलेख्यांचे जतन हे संगणकीकृत होऊन कामकाजामध्ये सुलभता येणार आहे. कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची कामे गतिमान व सुलभ होऊन, शासनाच्या सेवा वेळेत पुरविणे सोपे होईल. प्राथमिकत: मुंबई मुख्य कार्यालयामध्ये यासाठी आवश्यक ती पुर्तता व त्यासाठीचे प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पुढील वर्षी या संचालनालयातील सर्व विभागीय कार्यालये ई-ऑफिस द्वारे जोडणेचे उददीष्ठ आहे.

केंद्र शासनाच्या केंद्रिकृत निरीक्षण प्रणाली (CIS) अंतर्गत सर्व विभागातील अधिका-यांनी नियोजीत भेटीसाठी दौरे केले व बाष्पकांचे/मितोपयोजकांचे तत्कालीन स्थितीतील निरीक्षण करुन, सदर प्रणालीमध्ये अहवाल सादर केले, तसेच बाष्पके अधिनियम व त्याखालील नियमांच्या तरतुदीनुसार बाष्पके कार्यरत आहेत का याची पाहणी केली. या निरीक्षणा दरम्यान कार्यरत बाष्पक / मितोपयाजकांमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्यांची पुर्तता करण्यात आली.

अधिका-यांच्या नियोजीत भेटी दरम्यान, परिसरातील कारखान्यांना भेटी देऊन, जर त्या कारखान्यांमध्ये अनाधिकृत किंवा बेकायदेशीर बाष्पक आढळल्यास, अशा बाष्पकांना प्रतिबंधीत करुन, बाष्पके अधिनियम व नियमांनुसार निरीक्षण करणेस सांगीतले जाते. यानुसार अहवालांकीत वर्षामध्ये ०२ बाष्पकांना प्रतिबंधीत आदेश व बाष्पकाची धारण क्षमता चाचणी करणेबाबत सुचना निर्गमित करणेत आल्या.

**बाष्पके उद्योगाला चालना देण्याकरिता तसेच बाष्पकाचा सुरक्षित व कार्यक्षम वापर करण्यांकरिता बॉयलर इंडिया-२०२२ या आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचे / चर्चासत्राचे आयोजन:**

बाष्पके, उद्योग आणि शासन या त्रिसूत्रीचे सांगड घालून लोककल्याण आणि बाष्पक व्यवसायाला चालना देण्यासोबतच बाष्पकांचा सुरक्षित आणि कार्यक्षम वापर कसा करता येईल या हेतूनं नवनवीन टेक्नॉलॉजी, मशीन यांची अद्यावत माहिती देण्यासाठी आणि रोजगारांच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी बाष्पके संचालनालयाचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत वर्ष २००९ पासून बाष्पकांचा सुरक्षित आणि कार्यक्षम वापर या शीर्षकाखाली दरवर्षी प्रादेशिक कार्यालयांमध्ये कार्यशाळेचं आयोजन करण्यात येत होते व तदनंतर बाष्पके निरीक्षणाची १५० वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्तानं प्रत्येक प्रादेशिक कार्यालयामध्ये वर्कशॉप घेण्याऐवजी एकच मोठा कार्यक्रम करावा या हेतूनं बॉयलर इंडिया-२०२० हे वर्कशॉप आणि एक्झिबिशन घेण्यात आले. व नंतर संपूर्ण समूहासाठी हक्काचं व्यासपीठ म्हणून या कार्यक्रमाचं सेकंड एडिशन असलेलं बॉयलर इंडिया-२०२२ हे वर्कशॉप आणि एक्जीबिशन दिनांक १४ ते १६ सप्टेंबर २०२२ या कालावधीत सिडको प्रदर्शन आणि परिषद केंद्र, वाशी, नवी मुंबई इथं आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्यातील तसेच देशातील बाष्पक निर्मिती, व बाष्पक निर्यातीला चालना देण्याकरिता तसेच बाष्पकाचा सुरक्षित व कार्यक्षम वापर करण्यांकरिता या संचालनालयाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

बॉयलर इंडिया २०२२ या प्रदर्शनी व चर्चासत्राचे उदघाटन दिनांक १४ सप्टेंबर २०२२ रोजी मा.ना.डॉ.सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार), मा.ना.श्री.उदय सामंत, मंत्री (उद्योग), मा.आ.श्री.निरंजन डावखरे (वि.प.सदस्य), मा.आ.श्री.रमेश दादा पाटील (वि.प.सदस्य), कामगार विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती विनिता वेद सिंगल (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी रायगड तथा विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर (भा.प्र.से.), कामगार आयुक्त श्री.सुरेश जाधव (भा.प्र.से.), मे. ऑरेंजबीक टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. भानू राजगोपालन आणि बाष्पके संचालनालयाचे संचालक श्री. धवल अंतापूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

### ❖ ठळक वैशिष्टे ❖

- देश-विदेशातील एकूण ३० व्याख्यातामार्फत परिसंवादाचे आयोजन.
- सदर चर्चा सत्रात सुमारे २५०० + प्रतिनिधीनी सहभाग नोंदविला.
- सदर कार्यक्रमाला विविध ७ देशांच्या कॉन्सुल जनरलची उपस्थिती.
- २८०+ भारत आणि जगभरातील प्रदर्शकांचे स्टॉल
- जवळपास ४२ देशातील अभ्यागत उपस्थित होते.

### ❖ सर्वोत्कृष्ट बाष्पक वापरकर्ता - २०२२" स्पर्धेचे आयोजन ❖

सदर स्पर्धा प्रथमच वर्ष २०२० मध्ये Boiler India - २०२० मध्ये आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी पुरस्कारासाठी स्लोगन, पोस्टर, निबंध गुणांचा विचार करण्यात आला होता. परंतू नंतर विविध कारखानदार व त्यांचे प्रतिनिधी यांकडून सदर मानांकने रद्द करून फक्त बाष्पक व त्याचा सुनियोजित वापर यावर आधारीत स्पर्धा घेण्यात यावी असे अभिप्राय मिळत होते, त्यानुसार संचालक बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या सुचनेने ज्युरी पॅनेलने प्रचंड मेहनत घेऊन विविध श्रेणी मध्ये उद्योगाच्या प्रकारानुसार नवीन फॉर्म व मानांकने पुनः तयार केली व फक्त बाष्पक मापदंड यावरच अवलंबून न राहता इतर मानांकने जसे की

१. निरीक्षण किट व त्याचा वापर
२. आरेखन
३. ५-S गुणवत्ता मानके यांची अमलबजावणी
४. कारखान्याला मिळालेली राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पारितोषिके यांचाही विचार करण्यात आला.

स्पर्धेचा दर्जा वाढविण्यासाठी ज्युरी पॅनेलमध्ये विविध आस्थापनांमधील उच्च पदस्थ, अत्यंत अनुभवी अशा सदस्यांचा समावेश करण्यात आला होता. सदर स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून सर्व ६ श्रेणीतील बाष्पक वापरकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**स्पर्धेत सहभाग घेणारे एकूण कारखानदार-१७६, विभागवार आकडेवारी खालीलप्रमाणे:**

| बृहन्मुंबई, रायगड, पालघर, ठाणे | पुणे | नाशिक | नागपूर | सोलापूर | अहमदनगर | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४३ | ३८ | ८ | ६५ | ३ | ५ | १४ | १७६ |

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील छोट्या छोट्या राईस मिल यांनी सुद्धा सदर स्पर्धेत सहभाग घेतला होता. फॉर्म सबमिट केल्यानंतर, प्रत्येक श्रेणीसाठी ज्युरींच्या पॅनेलद्वारे मुंबई कार्यालयात त्याचे मूल्यांकन केले गेले व छाननीनंतर पॅनेलच्या सदस्यांनी निवडलेल्या उद्योगांना भेट देऊन त्यांच्या अर्जांमध्ये केलेल्या दाव्यांची प्रत्यक्ष पडताळणी केली जेणेकरून स्पर्धेत पारदर्शकता व गुणवत्ता यावी याकडे लक्ष दिले. ज्युरी पॅनलने मूल्यमापनासाठी अख्खा महाराष्ट्र म्हणजे वडसा (गडचिरोली), ब्रम्हपुरी(चंद्रपूर) ते रत्नागिरी, डहाणू , अहमदनगर ते कोल्हापूर जिल्ह्यात म्हणजेच संपूर्ण महाराष्ट्राच्या लांबी आणि रुंदीला भेट दिली.

बॉयलर इंडिया -२०२२ या कार्यक्रमाची सांगता व सर्वोत्कृष्ट बाष्पक वापरकर्ता - २०२२ स्पर्धेचा पुरस्कार सोहळा सी.व्ही. रमण सभागृह, सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे १६ सप्टेंबर २०२२ रोजी पार पाडण्यात आला व त्यासाठी इंडोनेशियाचे कॉन्सुल जनरल श्री अगस सपतोनो प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच व्यासपीठावर इंडोनेशियाचे इकॉनॉमिक्स कॉन्सुल श्री तोल्हाह उबैदी व ढाका चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, बांग्लादेश चे संचालक श्री अब्दुल मन्नान हेही उपस्थित होते.

## ❖ बाष्पके संचालनालय एक दष्टीक्षेप ❖

सन २०२२-२०२३ या वार्षिक अहवाल कालावधीत अधिका-यांनी **५१२२** बाष्पकांना भेटी देऊन, बाष्पकांची निरीक्षणे केली व **४०५८** बाष्पकांना प्रमाणपत्रे निर्गमीत करण्यात आली.

महाराष्ट्र राज्यात एकूण **१०२७** बाष्पकांची निर्मिती झाली त्यापैकी **४२७** बाष्पके महाराष्ट्र राज्यात विकली गेली, तसेच इतर राज्यात **४१९** बाष्पके व परदेशात **७६** बाष्पके विकली गेली. या संचालनालयाच्या अधिका-यांनी निर्मिती अवस्थेमधील बाष्पके, मितिपयोजके, हिट एक्सचेंजर, प्रेशर पार्टस इ. निरीक्षणासाठी **४५९२** भेटी दिल्या. साधारण दहा वर्षापूर्वी बाष्पक आणि त्याचे पार्ट व संयत्रे निर्मिती करण-या कारखान्यांची संख्या अत्यल्प होती व प्रतीवर्षी यात वाढ होत गेली. सद्यस्थितीत बाष्पके व त्याचे प्रेशरपार्टस, लघु औदयोगिक बाष्पके, मितीपयोजक, प्रेशर व्हेसल्स, हिट एक्सचेंजर, माउंटींग / फिटींग्ज/ व्हॉल्वज निर्मिती करणारे कारखाने, तसेच टेस्टींग लॅबोरेटरीज, हिट ट्रिटर्स, पाईप फॅब्रिकेटर, इरेक्टर्स व रिपेअर्स या इतर सेवा देणा-या कारखान्यासहीत मान्यताप्राप्त कारखान्यांची एकूण संख्या **१३७२** इतकी आहे.

राज्यात विजेचा तुटवडा अधिक जाणवू लागल्याने,उद्योगावर अनिष्ठ परिणाम होऊ लागला अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड, टाटा पॉवर कंपनी, मुंबई आणि रिलायन्स एनर्जी, डहाणू यासारख्या विद्युत केंद्रांना उपलब्ध इंधनाद्वारे महाराष्ट्र राज्याचा विद्युत पुरवठा अखंडीत चालू ठेवण्यासाठी त्यांची बाष्पके सतत चालू ठेवावी लागली. तसेच इंधन प्रक्रिया करण्यासाठी रीफायनरीज व खते निर्मितीसाठी फर्टिलायझर कंपन्या सुध्दा पुर्ण क्षमतेने व अखंडपणे कार्यान्वित राहणे गरजेचे आहे. त्याकरिता मे. भारत पेट्रोलियम, मे. हिंदुस्थान पेट्रोलियम व मे.राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स या कंपन्यांनाही त्यांची बाष्पके सतत चालू ठेवावी लागली. या संचालनालयाने बहुतांशी बाष्पकांचे वेळेवर निरीक्षण करून दिले. त्यामुळेच तेल कंपन्यांना आपली उत्पादनाची उद्दीष्टे साध्य करण्यास आणि राज्याची विद्युत पुरवठयातील तूट कमी करण्यास मदत झाली.

महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ सहकारी साखर कारखान्यामुळे वाढली, फोफावली हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे खेडयापाडयात लहान मोठे पुरक उद्योग उभे राहिले. सहकारी व खाजगी साखर कारखाने सक्षमरित्या पूर्ण ताकदीने चालविण्यासाठी सर्व प्रथम बाष्पकाची गरज असते. गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी बाष्पक निरीक्षण, बाष्पक दुरूस्ती व जलदाब चाचणी इत्यादी महत्वपूर्ण कामे कारखान्यांना पूर्ण करावी लागतात. अर्थात या कामासाठी या संचालनालयाच्या निरीक्षण अधिका-यांच्या सहकार्याची आवश्यकता असते. सहकारी साखर कारखाने आर्थिक अडचणीत असताना गळीत हंगाम वेळेवर सुरू करण्यासाठी या संचालनालयाच्या निरीक्षण अधिका-यांनी बाष्पक निरीक्षणे वेळेवर करणे आवश्यक होते. या संचालनालयाच्या निरीक्षण अधिका-यांनी योग्य नियोजन करून सर्वच्या सर्व साखर कारखान्यांतील बाष्पकांची त्यांच्या वेळेच्या मागणीनुसार वेळेवर निरीक्षणे पार पाडली. त्यामुळे साखर कारखान्यांना जास्तीत जास्त ऊसाचे गाळप करता आले.

बाष्पक निरीक्षण अधिका-यांनी स्थापित कारखान्यांना वेळोवेळी नियोजनपुर्वक निरीक्षण भेटी दिलयाने त्यांची उदिदष्टे पूर्ण होऊ शकली व परिणामी या विभागाचा महाराष्ट्रात नवीन कारखाने निर्मितीमध्ये व राज्याच्या औद्योगिक प्रगतीस हातभार लागला व रोजगार निर्मितीत वाढ झाली.

आस्तित्वात असलेल्या व नवनिर्मित बाष्पकांचे/मितीपयोजकांचे निरीक्षण, बाष्पनलिका, ट्यूब्ज व माऊटिग/फिटींग्ज इत्यादी बाष्पकाच्या सुटया भागांचे निरीक्षण, बाष्पदाब चाचणी असा निरीक्षणाचा मोठया प्रमाणावर असलेला वार्षिक निरीक्षण कार्यक्रम या संचालनालयातर्फे ०१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत निरीक्षण अधिका-यांची, सहाय्यक कर्मचा-यांची संख्या अत्यंत अपूरी असताना देखील अनेक अडचणीतून मार्ग काढीत पार पाडला, यामध्ये उपलब्ध अधिकारी/कर्मचा-यांनी परिश्रमपूर्वक बहुमोल सहकार्य केले.

**(ध.प्र.अंतापूरकर)**
संचालक, बाष्पके संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.




**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव - "हर घर तिरंगा"**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमीत्त "हर घर तिरंगा" उपक्रम बाष्पके संचालनालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यानी मोठ्या उत्साहात साजरा केला.



























**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव**

**"हर घर तिरंगा"**

# बॉयलर इंडिया २०२२ - क्षणचित्रे




मान्यवर उपस्थितांना मार्गदर्शन करत असताना





# बॉयलर इंडिया २०२२ - क्षणचित्रे




मान्यवरांसोबत बाष्पके संचालनालयातील सर्व अधिकारी तसेच सेवानिवृत्त माजी संचालक, सहसंचालक




सर्वोत्कृष्ट बाष्पक वापरकर्ता - २०२२ स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा इंडोनेशियाचे कॉन्सुल जनरल श्री अगस सपतोनो, इंडोनेशियाचे इकॉनॉमिक्स कॉन्सुल श्री तोल्हाह उबैदी व ढाका चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, बांग्लादेशचे संचालक श्री अब्दुल मन्नान यांच्या उपस्थितित पार पडला.

# बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन

## मुंबई कार्यालय

बाष्पके संचालनालय,कामगार भवन, सातवा मजला,
प्लॉट नं. सी-२०,ब्लॉक नं.-ई, वांद्रे कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२६५७११५५ /१२०१/१३५२/
कार्यालयीन ई मेल : dirsb.mumbai@maharashtra.gov.in

### सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

कै. ना.म. लोखंडे, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, निवासी इमारत
क्र.३, गायत्रीनगर, आयटी पार्कजवळ, व्हीएनआयटीच्या समोर,
परसोडी, नागपूर - ४४००२२.
दूरध्वनी क्रमांक: ०७१२-२२४२६८१/२२४७०९२
ईमेल: jtdirsb.nagpur@maharashtra.gov.in

### सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

कामगार कल्याण भवन, दुसरा मजला, संभाजीनगर,
चिंचवड, पुणे - ४११०१९.
दूरध्वनी क्रमांक: ०२०-२७३७१६९७/१०५१
ईमेल: jtdirsb.pune@maharashtra.gov.in

### सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांचे कार्यालय

"हरेश", १६, बिजली को.ऑप. हौसिंग सोसायटी, शिलाविहार
जवळ, वसंत टेकडी, अहमदनगर - ४१४००३
दूरध्वनी क्रमांक: ०२४१-२४२१७४५
ईमेल: jtdirsb.ahmednagar@maharashtra.gov.in

### सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे कार्यालय

गाळा क्र.४, उद्योग भवन, आयटीआय जवळ, त्रंबक रोड,
सातपूर, नाशिक-४२२००७,
दूरध्वनी क्रमांक: ०२५३-२३६५३५७
ईमेल: jtdirsb.nashik@maharashtra.gov.in

### सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, कोल्हापूर यांचे कार्यालय

जुना राजवाडा, भवानी मंडप, कोल्हापूर - ४१६००२
दूरध्वनी क्रमांक: ०२३१-२५४२९२०/९०९
ईमेल: jtdirsb.kolhapur@maharashtra.gov.in

### सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य, सोलापूर यांचे कार्यालय

वितराग व्हर्टेक्स, पहिला मजला, ८३ ए, रेल्वे लाईन्स, नवल
पेट्रोल पंपासमोर, डफरीन चौक,
सोलापूर - ४१३००१, दूरध्वनी क्रमांक: ०२१७-२३१७०१५,
ईमेल: jtdirsb.solapur@maharashtra.gov.in

*॥ श्रमिकाणां कृते दक्षम् ॥*